पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर-४१३२५५ महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र.०२१७-२७४४७७१-७३ (११ लाईन्स) फॅक्स-०२१७-२३५१३००
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac ई-मेल:fao@sus.ac.in
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

**खरेदी व भांडार विभाग**

जा.क्र.पुअहोसोविसो/विवले/खभांवि/२०२४/ 813 — दिनांक: 23 DEC 2024

प्रति

------------------------

------------------------

**विषय: - प्रस्तुत विद्यापीठाच्या आवक जावक विभागासाठी सन २०२५-२६ या कालावधीत कुरिअर सेवेकरिता वार्षिक दरकरार करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत...**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठातील आवक-जावक विभागाकरिता सन २०२५-२६ या कालावधीमध्ये कुरिअर सेवेकरिता वार्षिक दरकरार करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. आपले अपेक्षित दर GST करासह अंदाजपत्रकामधील {***SCHEDULE - B***} तपशिलाप्रमाणे दरपत्रकामध्ये भरुन मा. वित्त व लेखा अधिकारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या नावे सीलबंद लिफाफ्यात पाठवावे. दरपत्रकासंदर्भात सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

वरील कामाचे दरपत्रक, सुचना सोलापूर विद्यापीठाच्या *http://sus.ac.in* या संकेतस्थळावर ***(Quotation)*** या शिर्षकाखाली उपलब्ध आहे. **तसेच सोबत जोडलेल्या Schedule-B मधील तपशिलाप्रमाणे दरपत्रक सादर करावे.**

| अ.क्र | तपशिल | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | दरपत्रके प्रकाशित करण्याचा दिनांक व वेळ | २३/१२/२०२४ | | वित्त व लेखा विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग, केगांव, सोलापूर- ४१३ २५५ |
| २. | दरपत्रके स्विकारण्याची दिनांक व वेळ | २३/१२/२०२४ | | |
| ३. | दरपत्रक सादर करणे अंतिम दिनांक व वेळ | ०१/०१/२०२५ | सायं. ०६.०० | |
| ४. | दरपत्रक उघडण्याचा दिनांक/वेळ आणि ठिकाण (शक्य झाल्यास) | ०२/०१/२०२५ | दु. ०३.०० | |

(सीए. एम.एस. खराडे)
वित्त व लेखा अधिकारी

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## कुरिअर सेवा पुरविण्यासाठी वार्षिक दर करार करणे

### -अटी व शर्ती -

१) दरपत्रक हे सीलबंद पाकीटातून कार्यालयीन वेळेत मा.वित्त व लेखा अधिकारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर सोलापूर-पुणे महामार्ग केगांव, सोलापूर-४१३ २५५, यांच्या नावाने विहित मुदतीत पोहोचतील अशा बेताने पाठवावीत.

२) दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे. कुरिअर सेवे करिता वार्षिक दरकरार असा स्पष्ट उल्लेख तांत्रिक व दराच्या लिफाफ्यावर स्वंतत्रपणे करावा.

३) लिफाफा क्रं. १ (तांत्रिक निविदा): - हा तांत्रिक बाबीसाठी असुन त्यावर तांत्रिक दरपत्रक असे नमुद करावे. व त्यामध्ये दरपत्रकेतील सही व शिक्का सुचित केलेल्या सुचना व अटी, तसेच शॉप ॲक्ट, पॅन कार्ड, GST Registration Certificate, (वस्तु व सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र), तसेच राष्ट्र, राज्य, व जिल्हे इ. ठिकाणी कुरिअर सेवा उपलब्ध असल्याचे कंपनीचे माहितीपत्र, इ. साक्षांकित झेरॉक्स प्रती जोडुन सिलबंद पाकीटातून द्यावेत. (सेवाकर नोंदणी नसल्यास त्याबाबतचे कारण व करकपाती संदर्भात काही दायीत्व निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित फर्मची राहील याचे हमीपत्र तांत्रिक दरपत्रके सोबत जोडावे.)

४) लिफाफा क्रं.२ (दराची निविदा):- हा दरपत्रकासाठी असुन त्यावर दराचे दरपत्रक असे नमूद करावे. व त्यामध्ये दरपत्रकेतील पृष्ठ क्रं.४ वर दर नमुद करून सही शिक्क्यासह सिलबंद पाकीटातुन द्यावेत.

५) दर कराराबाबत वाटाघाटी करण्यात येणार नसल्यामुळे फर्मने जास्तीत जास्त न्युनतम दर दयावेत. दरपत्रके मधील नमुद दर हे अंतिम राहतील.

६) दिलेल्या मुदतीनंतर म्हणजेच उशिरा आलेल्या रपत्रकांचा विचार केला जाणार नाही. तसेच अटी व शर्ती मान्य असल्याबाबत स्वाक्षरी न केलेली / दरपत्रकामध्ये खाडाखोड अथवा दुरूस्तीसाठी व्हाईटर लावलेले दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.

७) दरपत्रक मान्य करताना फक्त दराचाच विचार केला जाणार नसुन नमूद कंपनीचा तसेच पुरवठादराच्या तात्काळ सेवासंहितेचा विचार केला जाईल.

८) काही कारणाने पुरवठादराने कराराच्या मुदतीत कुरीअर सेवा पुरविण्याचे नाकारले तर विद्यापीठ खुल्या बाजारातुन सदर सेवा घेईल व नुकसान झाल्यास त्याची वसुली पुरवठादाराकडुन केली जाईल.

९) ठेकेदारास वरील अटी व नियम मान्य असल्यास स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहुन द्यावा लागेल.

१०) दरकराराचा कालावधी एक वर्षाचा राहील. विद्यापीठास आवश्यकता वाटल्यास सदर करारास मुदतवाढ देण्यात येईल.

११) ज्या फर्मचे दर न्युनतम आहेत अशा फर्म सोबत करार करण्यात येईल. तसेच एकापेक्षा जास्त पुरवठादारानी समान दर दिले असल्यास त्याची सेवा विचारात घेऊन व त्यावर कुरिअर सेवा घेण्याचे अधिकार विद्यापीठास राहील.

१२) कुरिअरचे दर सर्व करासाहित (Including GST किंवा Excluding GST) व कार्यालयात पोहोंच किंमीतीसह द्यावेत.

१३) वस्तु व सेवाकर दि.०१/०७/२०१७ पासुन लागू झाल्यामुळे देयक सादर करताना वस्तु व सेवा कराचा स्वतंत्र उल्लेख देयकांचे करार तसेच देयक हे GST Format मध्येच सादर करावे.

१४) शासनाकडून वेळोवळी आकारणी करण्यात येणाऱ्या देयकामधुन कराची कपात करण्यात येईल.

१५) ज्या पुरवठाधारकाची दरपत्रक मान्य होईल त्या पुरवठाधारकास रक्कम रू.१०,०००/- (अक्षरी रू. दहा हजार फक्त) इतकी सुरक्षा रक्कम मा. वित्त व लेखा अधिकारी, पु.अ.हो.सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे नावें विद्यापीठातील वित्त व लेखा, रोकड विभागाकडे ऑनलाईन / एनएफटी, राष्ट्रीकृत बँकेच्या डी.डी.ने भरावी लागेल. जर सुरक्षा ठेव रक्कम वेळेत जमा न केल्यास व त्यानंतर दरकरार न केल्यास आपले दरपत्रक रद्द करण्यात येईल. आपले नाव काळया यादीत टाकण्याच्या कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

१६) ज्या पुरवठाधारकाची दरपत्रक मान्य होईल त्या पुरवठाधारकास रू.१००/-च्या स्टॅम्पवर करार करावा लागेल.(प्रस्तावित कालावधी एका वर्षासाठी असेल)

१७) दरपत्रके स्वीकारणे अथवा नाकारणे किंवा कोणत्याही टप्प्यावर प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेले आहेत.दिलेल्या मुदतीनंतर म्हणजेच उशिरा आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. तसेच अटी व शर्ती मान्य असल्याबाबत स्वाक्षरी न केलेली / दरपत्रकामध्ये खाडाखोड अथवा दुरूस्तीसाठी व्हाईटर लावलेले दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.

१८) **महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (शॉप ॲक्ट लायसन्स / उदयोग व आधार लायसन्स) मध्ये नमुद केलेल्या व्यवसायाचा संबंधित खरेदी अथवा कामाशी संबंध असणे आवश्यक आहे. (संबंधित साहित्य खरेदी व कामाचा अनुभव असणे बंधनकारक राहिल.)**

१९) सुरक्षा ठेव पोटी विद्यापीठाकडे जमा करण्यात आलेली रक्कम कराराचा कालावधी संपल्यानंतर व काम/ सेवेबाबत समाधान कारकरित्या संपल्यानंतर पुरवठादारास मागणीप्रमाणे परत करण्यात येईल.

२०) वरील दरपत्रकासंदर्भात काही शंका / अडचण असल्यास विद्यापीठाच्या ०२१७-२७४४७७०-७४ (Ext.१७३) या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

२१) कुरिअर दरवाढीसंदर्भात किंवा इतर संदर्भात काही वाद निर्माण झाल्यास याबाबत मा.कुलगुरू यांना निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार राहतील.

२२) कुरिअर सेवा पुरविण्यासाठी विद्यापीठातील सर्व टपाले पत्रे समक्ष येवून खात्री करून दररोज दुपारी ४.०० वाजता घेऊन जावे लागेल याबाबत दिरंगाई झाल्यास व त्यामुळे विद्यापीठाचे नुकसान झाल्यास त्याची वसुली पुरवठादाराच्या सुरक्षा ठेव मधुन करण्यात येईल.

**विशेष सुचना :- वरील सर्व सुचना व अटी मान्य असुन माझेवर बंधनकारक आहेत.**

**दिनांक :-**

**पुरवठादाराची स्वाक्षरी व शिक्का**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,सोलापूर विद्यापीठ,सोलापूर

लिफाफा क्र.02 दरपत्रक

- <u>कुरिअर सेवा पुरविण्यासाठी वार्षिक दर करार करणे</u> -

| अ. क्र. | तपशील | दर सर्व करासहीत पोहच देणे प्रत्येकी 200 ग्रॅमपर्यंत | दर सर्व करासहीत पोहच देणे प्रत्येकी 200 ग्रॅमपुढील | टपाल पोहचण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1 | सोलापूर शहर | | | |
| | संपूर्ण सोलापूर जिल्हा | | | |
| 2 | संपूर्ण महाराष्ट्र | | | |
| 3 | आंतरराज्य | | | |

* वरील दर हे सर्व करासहीत आहेत.

दरपत्रक धारकांची सही व शिक्का